# श्रीरंगीयाना, 'प्रोस्ट्रॅटा'चा शोध

## क्रोटालारिया कुळातील वनस्पती ; शिवाजी विद्यापीठाचे यश

ओंकार धर्माधिकारी : सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २३ : शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र विभागातील प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी 'क्रोटालारिया श्रीरंगीयाना' आणि 'क्रोटालारिया प्रोस्ट्रॅटा निगरीस्पर्मा' या दोन वनस्पती शोधल्या आहेत. यातील 'श्रीरंगीयाना' वाई-महाबळेश्वर मार्गातील पसरणी घाटात सापडते. 'प्रोस्ट्रॅटा निगरीस्पर्मा' पन्हाळ्याजवळील मसाई पठार येथील गवताळ माळावर आढळते. दोन्ही वनस्पती जैवविविधतेच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. प्रा. डॉ. एस. आर. यादव आणि प्रा. डॉ. एन. बी. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन झाले.**

गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली कृष्णात रोकडे कन्याकुमारी ते मध्य प्रदेश टापूतील प्रदेशनिष्ठ क्रोटोलारिया वनस्पतींच्या गुणसूत्रांचा अभ्यास करत आहेत. यावेळी त्यांना पसरणी घाटात क्रोटालारिया प्रजातीमधील श्रीरंगीयाना वनस्पती आढळली.

श्रीरंगीयाना वनस्पतीची फुले, शेंगांचा आकार वेगळा असल्याने एका स्वतंत्र वनस्पतीची नोंद झाली. ती हवेतील नत्र शोषून घेते आणि मुळांवरील गाठीमध्ये त्याचा साठा होतो. पुढे नत्र जमिनीत जाते. त्यामुळे जमिनीतील नत्र वाढते.

डॉ. यादव यांच्या मार्गदर्शनाखाली 'क्रोटालारिया प्रोस्ट्रॅटा निगरीस्पर्मा' वनस्पतीचे संशोधन झाले. मसाई पठारावर आढळलेली ही वनस्पती जमिनीलगत पसरते. ती फुलपाखरांच्या जीवनचक्रातील महत्त्वाची आहे. फायटोटॅक्सा या नियतकालिकामध्ये संशोधन प्रसिद्ध झाले आहे.

> **वनस्पतींच्या गुणसूत्रांबद्दलचे संशोधन सुरू असताना 'क्रोटालारिया श्रीरंगीयाना' सापडली. या वनस्पतीला मराठीमध्ये 'खुळखुळ' असे म्हटले जाते. जैवविविधतेच्या दृष्टिकोनातून ही वनस्पती अत्यंत महत्त्वाची आहे. जमिनीतील नत्रवाढीसाठी उपयुक्त ठरू शकते.**
> **- प्रा. डॉ. एन. बी. गायकवाड**





कोल्हापूर : क्रोटालारीया श्रीरंगीयाना. दुसऱ्या छायाचित्रात 'क्रोटालारीया प्रोस्ट्रॅटा निगरीस्पर्मा'.

### नावातून व्यक्त केली कृतज्ञता



**डॉ. श्रीरंग यादव**

डॉ. श्रीरंग रामचंद्र यादव ऊर्फ एस. आर. वनस्पतीशास्त्र विभागाचे माजी प्रमुख आहेत. त्यांचे वनस्पती संशोधनात मोठे योगदान आहे. त्यांच्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी डॉ. एन. बी. गायकवाड आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या वनस्पतीला यादवसरांच्या नावावरून 'श्रीरंगीयाना' हे नाव देत कृतज्ञता व्यक्त केली.

> **'क्रोटालारिया प्रोस्ट्रॅटा निगरीस्पर्मा'च्या बियांचा रंग काळा असतो. फुलपाखरांच्या काही प्रजातींचे जीवनचक्र या वनस्पतीवर अवलंबून आहे. त्यामुळे ती महत्त्वाची आहे.**
> - **कृष्णात रोकडे**, शिक्षक, पद्माराजे ज्युनिअर कॉलेज

### श्रीरंगीयानाची वैशिष्ट्ये

- उंची दीड मीटर
- बियांचा आकार मोठा; पण संख्या कमी
- जमिनीतील नत्र वाढवण्यास उपयुक्त
- फुले पिवळी
- फुलोऱ्याचा कालावधी नोव्हेंबर ते फेब्रुवारीपर्यंत

### प्रोस्ट्रॅटाची वैशिष्ट्ये

- सपुष्प प्रजाती
- फुलोऱ्याचा कालावधी नोव्हेंबर ते जानेवारी
- वनस्पतीवर फुलपाखरांचे प्रजनन, अंडी घालणे होते

# बॅकलॉगच्या विद्यार्थ्यांची संख्या शासनाने मागवली

## अंतिम वर्षाच्या ऐच्छिक परीक्षांची तयारी सुरू

कोल्हापूर, ता. २३ : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सरकारने पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांची परीक्षा घेण्याची तयारी सुरू केली आहे. त्यासाठी शासनाने बॅकलॉग असणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती मागवली असून विद्यापीठाने ती दिली आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांत २५ हजार विद्यार्थी बॅकलॉग असणारे आहेत. त्याचबरोबर विद्यापीठांतर्गत येणाऱ्या २९३ महाविद्यालयांत अंतर्गत गुण देण्यासंदर्भात काम युद्धपातळीवर सुरू आहे.

राज्य सरकारने पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या पहिल्या, दुसऱ्या वर्षांच्या परीक्षा रद्द केल्या, त्यांना झालेल्या सेमिस्टरचे गुण आणि अंतर्गत परीक्षेतील गुण यांच्या आधारे सरासरी गुण दिले जाणार आहेत. तसेच अंतिम वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षा ऐच्छिक ठेवली आहे. तसेच जे विद्यार्थी झालेल्या सेमिस्टरमध्ये नापास झाले आहेत, त्यांची परीक्षाही होणार आहे. त्यासाठी बॅकलॉग झालेले विद्यार्थी किती आहेत याची माहिती मागवली आहे. पुढील काही दिवसांत राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील सर्व कुलगुरू आणि परीक्षा नियंत्रक यांची बैठक होणार असून, यामध्ये विद्यापीठांच्या ऐच्छिक परीक्षांबाबत पुढील दिशा ठरवली जाईल.

लोकमत

# विद्यापीठात २५ हजार विद्यार्थ्यांचा 'बॅकलॉग'

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विविध विषयांच्या अंतिम सत्रातील सुमारे २५ हजार विद्यार्थ्यांचा 'बॅकलॉग' आहे. त्याबाबतची माहिती विद्यापीठाने राज्य शासनाला सादर केली आहे. एम. एस्सी.सह तत्सम अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षांचे अर्ज भरण्यास १० जुलैपर्यंत मुदतवाढ दिली आहे.

अंतिम सत्रातील ज्या विद्यार्थ्यांचे बॅकलॉग (मागील सत्रातील विषयात अनुत्तीर्ण) आहेत, त्यांची माहिती शासनाने मागविली होती. त्यानुसार विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने विषयनिहाय या विद्यार्थ्यांची माहिती उच्च शिक्षण विभागाच्या माध्यमातून शासनाला सादर केली आहे. शासन आदेशानुसार परीक्षांबाबतची कार्यवाही विद्यापीठाकडून केली जाणार आहे.

अंतिम सत्रातील परीक्षेसाठी पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांची एकूण संख्या ७५ हजार आहे. त्यातील ४५ हजार विद्यार्थी हे नवीन, तर सुमारे २५ हजार विद्यार्थी हे बॅकलॉगमधील आहेत. कोल्हापूर, सांगली आणि साताऱ्यातील एकूण २९३ महाविद्यालयांत प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांचे अंतर्गत गुण भरण्याची प्रक्रिया सुरु झाली असल्याची माहिती प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली. दरम्यान, प्रवेश परीक्षांचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरावयाचे आहेत.

# डॉ. भोसले यांचे नाव संशोधन केंद्राला द्या

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्राला ज्येष्ठ अवकाश संशोधक डॉ. आर. व्ही. भोसले यांचे नाव द्यावे. विद्यापीठात तारांगण आणि विज्ञान केंद्र स्थापन करावे, अशी मागणी युवा सेनेने केली. याचे निवेदन प्रभारी कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांना दिले. जिल्हा युवा अधिकारी मंजित माने, शेखर बारटक्के, आदींचा शिष्टमंडळात समावेश होता.